MHAH180044002015

## .नियमित दावा क्रमांक ६२० सन २०१६ नि ७ खालील आदेश
**सीनआर क्रमांक MHAH18004400 2015**

१.श्री रामदास दगडु चौधरी
२.श्री दगडु धोंडिराम चौधरी
३.श्री कारभारी धोंडिराम चौधरी ..वादी
विरुध्द
१.श्री विलास रामकिसन ढोकणे
२.मंदाबाई रामकिसन ढोकणे
३. भिमाबाई बबन ढोकणे... एकतर्फा
४. श्री बबन भिकाजी ढोकणे.... विना कैफियत
५. श्री.बाबासाहेब रामकिसन ढोकणे
६.श्री भारत भिकाजी ढोकणे.. विना कैफियत
७. श्री अण्णा मुक्ताजी दुशिंग.. एकतर्फा
८.विमल अशोक काळे .. एकतर्फा
९. श्री आसाराम मारुती भुसारी
१०.श्रीमती अरुणा साहेबराव नवले
११.श्रीमती कुसूम दत्तू नवले
१२.श्रीमती कल्पना विष्णु कदम
. .प्रतिवादी

....

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनरची -उपअधिक्षक, तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी यांची नेमणुक होवून त्यांचे मार्फत दावा कलम १ मध्ये दर्शविलेल्या मिळकती मौजे कुक्कडवेढे ता राहुरी येथील गट क्रमांक २२९/१ व गट क्रमांक २२९/२ व गट क्रमांक २२९/३ च्या बांध हद्दी निश्चिीत व मोजणी करुन तसा मोजणी अहवाल दाखल करणेसाठी केला आहे.

### वादीचा प्रस्तुतचा अर्ज थोडक्यात खालीलप्रमाणे -

**२.** वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द दावा मिळकतीची मोजणी होवुन बांध हद्दी निश्चित होवून व निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे.

**३.** दावा कलम १ मधील मौज कुक्कडवेढे ता राहुरी येथील गट क्रमांक २२९/१ पैकी क्षेत्र ०१.७७ आर ही वादी क्रमांक १ ते ३ व प्रतिवादी क्रमांक ९ यांच्या

मालकीची व दावा मिळकत गट क्रमांक २२९/३ पैकी १-७७ आर क्षेत्र वादी क्रमांक ३ चे मालकी वहिवाटीची मिळकत आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्रमांक ९ ते १२ यांची गट क्रमांक २२९/२ ही मिळकत आहे.

**४.** दावा सोबत वादी, प्रतिवादी यांचे मिळकतीचा कच्चा नकाशा दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांचा एकमेकांच्या मिळकतीशी काही एक हक्क हितसंबंध नाही असे असतांना प्रतिवादी क्रमांक १ ते ८ हे त्यांचे मिळकतीची नांगरणी, पेरणी व मेहनत मशागत करतेवेळी वादीचे मिळकतीचे बांधाची मोडतोड करुन त्यामध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करतात. वादी व प्रतिवादी क्रमांक ९ ते १२ यांनी त्यांचे मिळकतीची खाजगी मोजणी केली असता त्यांचे क्षेत्र कमी भरते.

**५.** प्रतिवादी हे आडदांड व नंगट असून त्यांनी दिनांक ०१.०९.२०१६ रोजी वादी व प्रतिवादी यांचे समाईक बांधाची मोडतोड करुन दावा मिळकतीत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला . म्हणून वादीची विनंती की दावा मिळकतीची कोर्ट कमिशनर म्हणून तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी मार्फत मोजणी करुन वादीच्या बांधाच्या क्षेत्राच्या हद्‌दी ठरवून खूणा कायम करुन दयाव्यात म्हणून सदरचा अर्ज दाखल केलेला आहे

**६.** प्रतिवादी क्रमांक १,२ व ५ चे विधीज्ञ श्री.एन.बी. ढोकणे यांनी आपले म्हणणे दाखल केलेले नाही.

**७.** प्रतिवादी क्रमांक ९ चे विधीज्ञ श्री बी.एस. बाचकर यांनी सदरचा अर्ज व रे.मु.नं २३/२०१७ मधील नि ७ चा अर्ज बाबत एकत्रित आदेश करुन रे.मु. नं ६२०/२०१६ व रे.मुनं २३/२०१७ व मधील वादीनी ५० टकके फी भरण्याबाबत आदेश करावा असे म्हणणे दिलेले आहे..

**८.** प्रतिवादी क्रमांक १० ते १२ चे विधीज्ञ श्री बी.एस नवले यांनी देखील त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

**९.** वादी व प्रतिवादी क्रमांक १ ,२ व ५ यांचे व प्रतिवादी क्रमांक ९ चे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला

**१०.** वादीचा अर्ज व संचिकेचे अवलोकन केले असता, नि ३ /१ मध्ये वादीने दाखल केलेल्या सात बाराच्या उता-यावरुन वादीचे नाव दिसून येते.

**११.** प्रस्तुतचा दावा हा बांध हद्दी निश्चित होण्यासाठी तसेच दावा मिळकतीची मोजणी होउन मिळणेसाठी व निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादातील निश्चित मुद्दयांचा गुण दोषावर निकाल करण्यासाठी तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी यांना कोर्ट कमिशनर म्हणून प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीमध्ये किती अतिक्रमण केलेल आहे ते क्षेत्र दर्शविण्यासाठी व बांध हद्दी निश्चितीसाठी नेमणुक करणे गरजेचे आहे. त्यामुळे, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | .वादीचा अर्ज (नि ७)मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | . तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते. तसेच त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी दावा कलम १ मधील नमूद केलेली दावा मिळकत- गट क्रमांक २२९/१ व २२९/३ तसेच लगतच्या जमीनींची मोजणी तेथील सभोवतालची परिस्थिती, विभागणी रेकॉर्ड विचारात घेवून त्यांच्या हद्दी निश्चित करुन, अतिक्रमण केलेले क्षेत्र वेगळे दाखवून तसा अहवाल व नकाशा आदेश पारित केल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत या न्यायालयाकडे दाखल करावा . |
| २ | . वादीने कोर्ट कमिशनरची फी एक आठवडयाच्या आत तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी यांचे कार्यालयात भरावी. |
| ३ | .वादीने कोर्ट कमिशनरची ५० टक्के फी व प्रतिवादींनी कोर्ट कमिशनरची ५० टकके फी तालुका भूमि अभिलेख निरीक्षक, राहुरी कार्यालयात भरल्यानंतर त्याबाबतची पावती न्यायालयात दाखल केल्यानंतर कोर्ट कमिशन रिट पाठविणेत यावी. |

| | |
|---|---|
| .दिनांक : २३.०३.२०२१<br>राहुरी | (माया.पो.मथुरे)<br>२रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर<br>राहुरी |